# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सहाय्यक आयुक्त (बाजार) यांचे कार्यालय

१ ला मजला, महात्मा ज्योतिबा फुले मंडई, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट, मुंबई - ४००००१
दूरध्वनी क्र. (०२२) २३४४०७४९ / २३४२९६३४

क्र.स.आ/बाजार/००१६७१/ दि. १६/०४/१९

## जाहीर नोटीस

जी दक्षिण विभागातील रेल्वे रुळावरील डिलाई रोड पूल हा मोडकळीस आला असल्यामुळे सदर पुलाचा रेल्वेकडील भाग तोडण्यात आला असून रस्त्यावरील मनपाच्या हद्दीतील पूल तोडण्याचे काम बाकी आहे.

जी / दक्षिण विभागातील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या खामकर मंडईतील अनुज्ञापत्रधारक हे डिलाई पुलाच्या बाजूला बसून व्यवसाय करीत होते. खामकर मंडईच्या दुरुस्तीचे काम पूर्ण होईपर्यंत सदर अनुज्ञापत्रधारकांना तात्पुरत्या स्वरुपात पर्यायी ठिकाणी स्थलांतरीत होण्याबाबत दि. ०४/०४/२०१९ रोजी नोटीस सुध्दा देण्यात आली आहे. सदर पुलाची दुरुस्ती तात्काळ करावयाची असून सदर नोटीस मिळाल्यापासून ४८ तासांत त्यांना दिलेल्या पर्यायी ठिकाणी स्थलांतरीत करावयाचे होते. तरी सदर सूचना ही जनतेच्या माहितीकरिता असून जे अनुज्ञापत्रधारक अद्याप पर्यायी ठिकाणी स्थलांतरीत झाले नाहीत त्यांनी ताबडतोब स्थलांतरीत व्हावे याकरिता देण्यात आली आहे.

तसेच सदर सूचना ही व्यापक जनहितार्थ देण्यात आली असून नागरिकांनी सदर पुलाच्या बाजूला जाणे टाळावे तसेच तेथे असलेल्या अनुज्ञापत्रधारकांकडून / व्यवसायीकांकडून खरेदी थांबवावी व अनुज्ञापत्रधारकांनी सदर पुलाच्या दुरुस्तीसाठी सहयोग करावे ही विनंती.

सही/-
पीआरओ/३८/जाहिरात/२०१९-२० सहाय्यक आयुक्त (बाजार)

**येता कणकण तापाची तपासणी करून घ्या रक्ताची.**

Scanned by CamScanner